# रहस्य यशाचे ...

## भारत महासत्ता कधी बनेल – २०२० मध्ये का २०२०० मध्ये?

भारत आज संध्याकाळी चार वाजेपर्यंत महासत्ता बनू शकतो, भारत दोन महिन्यानंतर महासत्ता बनू शकतो, भारत २०२० मध्ये महासत्ता बनू शकतो, ... ही वाक्ये वाचायला आणि ऐकायला कोणत्याही भारतीय व्यक्तीस चांगली वाटू शकतात. पण दुर्दैवाने भारत असो किंवा कोणताही देश सर्व निसर्गाच्या महासत्तेखाली येतात. अशा वेळेस एखाद्याला व्यक्तिगतरीत्या काय वाटते याच्याने निसर्गाला काही घेणेदेणे नसते. निसर्ग एखाद्या विशिष्ट देशाच्या नियमाने चालत नाही. निसर्गाचे स्वतःचे नियम आहेत. व्यक्ती असो वा देश प्रत्येकाला निसर्गाच्या नियमाने जावं लागतं. आणि निसर्गाचा नियम आहे – करा आणि मिळवा. जास्त करा, जास्त मिळवा.

'जास्त बोला आणि जास्त मिळवा' हा निसर्गाचा नियम नाही. देश कधीपर्यंत महासत्ता बनेल याची तारीख ठरवल्याने काही होत नाही. नियोजनबद्धपणे केलेल्या मेहनतीने होते. राजकारणी लोकांना हे कळत नाही असं नाही. सगळ्यांना सगळं कळतं. निवडणुकीचा प्रचार असेल तर सगळं नियोजनबद्ध पद्धतीनेच होतं. पण देशाच्या विकासाची गोष्ट आली तर त्यासाठी एक वर्ष निर्धारित केलेला ऐकायला मिळतो. २०२० पर्यंत असं होईल, २०४० पर्यंत असं आणि २०६० पर्यंत असं.

या ५–६ पृष्ठांच्या प्रकरणात काही किरकोळ गोष्टींचा उल्लेख केला जाऊ शकतो पण जास्त काही सांगता येऊ शकणार नाही. पण या विषयावर सुमारे दोनशे पृष्ठांचं मी एक पुस्तक लिहीत आहे : भारत महासत्ता कधी बनेल – २०२० मध्ये का २०२०० मध्ये?

हे पुस्तक तुम्ही अवश्य वाचू शकता. वस्तुस्थिती काय आहे हे तरी तुम्हाला कळेल. दुसऱ्या देशांमध्ये माणसाला कसं वागवलं जातं आणि भारतात कसं हे तुमच्या लक्षात येईल. दुसऱ्या देशात विकास कार्यांमध्ये शासनाची कशी भूमिका असते आणि येथे कशी हे तुम्हाला कळेल. इतकंच नाही स्वतःचा आणि पर्यायाने देशाचा विकास

करणाऱ्यांना येथे निरनिराळ्या त्रासांना तोंड द्यावं लागतं. कंटाळून त्यातले काही देश सोडून निघून जातात आणि परदेशातील संधींचा वापर करून तेथे स्वतःचा विकास करतात. मग बेशरमाप्रमाणे सांगितलं जातं की हे भारतीय वंशाचे अमेरिकन आहेत. का बनले ते भारतीय वंशाचे अमेरिकन? भारतीय वंशाचे भारतीयच का राहू शकले नाहीत ते? का स्वतःचा देश सोडून त्यांना दुसरीकडे जावं लागलं? ही केवळ एक गोष्ट नाही. सगळ्याच क्षेत्रांचं असं आहे. शासनाकडून सर्वच क्षेत्रात विकासकार्ये केली जाऊ शकली असती, लोकांना साहाय्य करून त्यांचं जीवनमान उंचावलं जाऊ शकलं असतं. पण केलं जातं तर याउलट. आगामी पुस्तकात या गोष्टी तुम्हाला सविस्तर वाचायला मिळतील.

देशाच्या अधोगतीमध्ये किंवा न झालेल्या प्रगतीमध्ये सगळ्यात मोठा वाटा शासनाचा आहे. सामान्य जनतेचा यात किरकोळ दोष असू शकतो पण मग यात सुद्धा नेत्यांचा व प्रशासनाचाच हात आहे असे म्हणावे लागेल. त्यांनी जनतेला योग्य दिशा दाखवली नाही, जनतेसमोर कोणता आदर्श प्रस्थापित केला नाही.

लोक क्रिकेट पाहण्यात वेळ वाया घालवत असले तर त्यांना आणखी प्रोत्साहित करण्यासाठी स्वतः सुद्धा सामना पाहायला ते मैदानात पोहोचले. कोणी असं बोलला नाही की क्रिकेटबद्दल एवढे जास्त उत्साहित होऊन स्वतःचा वेळ वाया घालवू नका. क्रिकेट थोड्याफार देशांमध्ये, त्यातही जास्त करून अविकसित देशांमध्येच खेळला जाणारा खेळ आहे. महासत्ता असलेले अमेरिका, चीन, रशिया, जपान कुठे क्रिकेट खेळतात? आणि ते ज्या ऑलिम्पिक्समध्ये उतरतात तेथे तर काही विशेष आपण आत्तापर्यंत केलेलंच नाही. मला तर क्रिकेट म्हणजे शासनाच्या विकासविरोधी आणि भ्रष्ट कृत्यांकडे लोकांचं लक्ष न जाऊ देण्यासाठी रचलेलं एक षड्यंत्र वाटतं.

भ्रष्टाचाराबद्दल एक गृहस्थ सांगत होते – 'लोकांचं सुद्धा चूक आहे, त्यांनी लाच द्यायलाच नको. आपोआप भ्रष्टाचार कमी होतो.' लोक बिचारे असेच भोळेभाबडे असतात. त्यांना हे कळत नाही की लाच देणं ही दुसरी पायरी आहे. पहिली पायरी आहे लाच घेणं. मी महिन्याला पगार घेत आहे ही जाणीव ठेवून शासकीय कर्मचारी जर प्रामाणिकपणे काम करू लागले तर लाच देण्याची गरजच कुठे पडते? सर्वसामान्य माणूस त्याला दिला जाणारा त्रास टाळण्यासाठी लाच देतो. त्याला त्रासच दिला गेला नाही तर.

शैक्षणिक व्यवस्था अशी आहे की लोक फक्त नोकरीला लक्ष्य बनवून शिक्षण घेतात. आधीच कमी मेहनत घेण्याचा मानवी स्वभाव आणि त्यात शासनाकडून दर्जेदार शिक्षण नाही तर सामान्य लोक करतील तरी काय? काही वेळा काही गोष्टींमध्ये लोक नियमाप्रमाणे वागत नाहीत. पण मग प्रशासकांचा आणि नेत्यांचा कोणता नियमाने चालण्याचा त्यांच्यापुढे आदर्श असतो? एकंदरीत देशाच्या अविकसित आणि भ्रष्ट

असण्यामध्ये सत्ताधारी लोकांची व कर्मचाऱ्यांचीच भूमिका असते. सामान्य जनतेचा किरकोळ दोष असू शकतो आणि तो सुद्धा बहुतांश वेळा त्यांच्या मजबुरीमुळे असतो. त्याला मुद्दा बनवणं म्हणजे आपल्या महापापाला लपवण्यासाठी क्षुल्लक गोष्टींना समोर करण्यासारखं आहे.

येथे विकासकार्याचा पुरावा देणारा एक साधा रस्ता किंवा फ्लाय ओव्हर बनतो तर त्यासाठी कितीतरी वर्ष 'काम चालू आहे' च्या नावाखाली लोकांना येण्याजाण्याचा त्रास दिला जातो. त्यांच्या गाड्या खराब होतात, पेट्रोलचा अपव्यय होतो, वेळ वाया जातो, कंबरडे मोडते, आणि असेच भरपूर त्रास होतात,... कोणता तरी एक मंत्री असा आहे का की काय चाललंय हे या देशामध्ये या विचारांनी त्याच्या डोळ्यांत अश्रू येतात? चीनच्या ग्वांगझू शहरात म्हणे ४५ किलोमीटरचा फ्लाय ओव्हर आहे आणि तो बनला फक्त ८ महिन्यात. याच शहरात काही वर्षाआधी ज्या रस्त्यावर म्हणे एकही वृक्ष नव्हता तेथे आता वृक्षांच्या रांगा आहेत. हे वैज्ञानिक पद्धतीने असं केलं गेलं की काही वर्षांतच जणू १००-५० वर्षे जुने वाटावेत असे वृक्ष उभे राहिले. आणि भारतात नुसती भाषणे असतात – वृक्ष लावा, वृक्ष जगवा.

सत्तेत असलेला माणूस काही जनतेचा नातेवाईक नसतो. एक अनोळखी माणूस जेव्हा इतर लोकांवर राज्य करत आहे आणि सोबतच त्यांच्याकडून निरनिराळे कर सुद्धा घेत आहे तेव्हा त्याचं हे नैतिक कर्तव्य बनतं की त्याने त्याचा मोबदला लोकांच्या अपेक्षेपलीकडे जाऊन दिला पाहिजे. लोकांना निश्चिंत राहण्याचा सल्ला देऊन काम करण्याची जबाबदारी स्वतः उचलली पाहिजे. पण घडतं काय? तुमच्यावर सत्ता करण्याचं हक्क द्या, पैसे द्या आणि मोबदल्यात ऐका वाक्ये आणि सहन करा त्रास.

'जागो, ग्राहक जागो, आपकी सतर्कता ही आपको बचा सकती है.' प्रशासनाचं काय काम मग? ते काय पगारासाठी एक तारखेची वाट पाहण्यासाठीच आहेत?

जगातील सर्व प्रगत देश त्यांच्या नागरिकांच्या अधिकाराप्रति खूप दक्ष असतात. प्रगत देशातील एक पोलीस आयुक्त सुद्धा तेथील नागरिकाला विनाकारण थांबवू शकत नाही. त्याला माहीत असतं हे मानवाधिकारांचं उल्लंघन आहे. आणि भारतात साधा हवालदार सुद्धा हे समजून जगत असतो की त्याला लोकांना थांबवून त्यांच्या जीवनात हस्तक्षेप करण्याचा अधिकार आहे. त्याला या गोष्टीचं सुद्धा भान असत नाही की ज्यांना थांबवून तो व्यत्यय आणत आहे त्यांच्याच पैशातून त्याच्या अंगावरचे कपडे आलेले आहेत. महिन्याला मिळणारा पगार सुद्धा त्यांच्याच पैशातून आलेला असतो. सगळ्या खात्यांचं असंच आहे. प्रत्येक खात्याच्या कर्मचाऱ्याकडे सामान्य जनतेला त्रास देण्याची कारणे असतात. बेरोजगारीने त्रस्त होऊन एखादा व्यवसाय करायला निघालेल्या व्यक्तीला

२५ प्रकारचे परवाने काढण्याचा त्रास देण्यासाठी प्रशासन सज्ज असते.

बाहेरच्या देशातील व्यक्ती कार, बस किंवा ट्रेनने ५०० किलोमीटरचा प्रवास सुमारे दोन तासात करून स्वतःचा आणि देशाचा विकास करण्यासाठी मोकळी होते. आणि येथे हा प्रवास सुमारे १५ तासांत होतो आणि त्यानंतर १५ तासांच्या प्रवासाने थकलेली व्यक्ती स्वाभाविकपणे ५-६ तास विश्रांती घेते. अर्थात एका गोष्टीसाठी विकसित देशांना दोन तास लागत आहेत आणि त्यासाठी आपले वीस तास वाया जात आहेत. मग त्या देशांना मागे पाडून आपण महासत्ता बनणार असं म्हणणंच किती गमतीशीर आहे. म्हटलं जातं की भारतात सध्या सुद्धा तेवढाच रेल्वेमार्ग आहे जेवढा इंग्रजांनी त्यांच्या काळात टाकलेला होता. काही मार्गांतील रूळ बदलला गेला पण नवीन रेल्वेमार्ग टाकले गेले नाहीत. कल्पना करा दुसऱ्या देशांमध्ये सुद्धा ६५ वर्षांनंतर तेवढ्याच अंतराचा रेल्वेमार्ग राहिला असेल का? अशा वेळेस देश महासत्ता बनणार म्हणणं म्हणजे काहीही न करता खूप काही करणाऱ्यांच्या पुढे जाण्याचं स्वप्न पाहिल्यासारखं आहे.

रेल्वे स्टेशनवर आधी तिकिटासाठी रांग लावा, त्यानंतर ट्रेन उशिरा असल्यामुळे वाट पाहत बसा. ट्रेन आल्यानंतर ती जवळपास भरलेली असते. कसेतरी उभे राहून किंवा सामान ठेवण्याच्या जागेवर बसून तुम्हाला प्रवास करावा लागतो. ट्रेनच्या गतीमुळे हा तुमचा त्रास लवकर संपत सुद्धा नाही. या गोष्टी दूर करण्यासाठी शासन काय करत आहे? काहीच नाही. कारण शासनाकडे असं का घडत आहे याची कारणे आहेत, पर्यायी व्यवस्था करण्याची त्यांची तयारी नाही. ज्या लोकांना इतरांच्या त्रासाची जाणीव नाही खरं तर त्यांना या पृथ्वीवर राहण्याचाच हक्क नाही. महासत्ता बनणं तर खूप दूरची गोष्ट आहे.

'टॅक्स चोरीमें सरकार की मदद किजीये, आपका नाम गुप्त रखा जायेगा'. कधी तुम्ही असं ऐकलंत रस्त्यावर एक खड्डा दिसला तर सांगा, ताबडतोब संबंधितांवर कारवाई केली जाईल; प्रशासनाकडून तुम्हाला होत असलेला त्रास निदर्शनास आणून द्या, ताबडतोब तुम्हाला न्याय दिला जाईल. म्हणजे लोकांकडून होत असलेली चूक दाखवा, शासनाकडून होत असलेली चूक दाखवू नका. शासनाची चूक दाखवाल तर पुन्हा तुम्हालाच त्रास. एका वेबसाइटवर लिहिलेलं होतं 'बिलामध्ये चूक दाखवा आणि आमच्याकडून दंड घ्या.' हे विकासाचं रहस्य आहे. जबाबदारी स्वीकारण्याची ही वृत्ती आहे. सामान्य जनतेच्या चुकांबद्दल दक्ष राहणं आणि स्वतःच्या चुकांची जाणीव नसणं याला प्रशासन म्हणता येत नाही. कठोर शब्दात सांगायचं तर याला गुंडगिरी म्हणावी लागेल.

प्रशासनाची अशी अवस्था पाहून खाजगी संस्था सुद्धा असंच करतात. एखाद्या ऑफरचा फोन लावून टेलिफोन कंपनी आधी तुमची शांतताभंग करते आणि डिस्टर्ब झाल्याच्या रागाने तुम्ही फोन कट करून टाकला तर तुमचे पैसे कापून घेते. विचाराल तर

म्हणेल तुम्ही अमुक गोष्ट विकत घेतली आहे. गंमत आहे तुम्हालाच माहीत नाही तुम्ही काय विकत घेतलंत? फोन करून का डिस्टर्ब केलात असं तुम्ही विचाराल तर उत्तर असेल तुम्ही 'डू नॉट डिस्टर्ब' साठी नाव नोंदवलेलं नाही. ही तर चक्क शासनाची स्टाइल झाली. म्हणजे आम्हाला त्रास देऊ नका म्हणण्यासाठी तुम्हाला नाव नोंदवावं लागेल आणि तुम्हाला त्रास देण्यासाठी कंपनीला तुमची परवानगी घेण्याची गरज नाही.

यात कसलीच शंका नाही की भारताचे कायदे व त्यातील पोटकायदे सामान्य माणसाच्या हिताचेच आहेत. पण दुर्दैव असा आहे की त्यानुसार कृती करणारा कोणी कायदेरक्षक नाही. शिवाय लोकांना ते माहीत नसावेत आणि त्यांच्या माहीत नसण्याचा गैरवापर करता यावा याचीच दक्षता घेणारे सर्व आहेत. न्यायालयांची प्रक्रिया दिवसांत किंवा महिन्यांत संपली असं कधी होत नाही. निकालासाठी उशीर होणं म्हणजे अपराध करणाऱ्यांना 'कायद्याचं भय बाळगू नका' असा संदेश देण्यासारखं आहे.

बाहेरचे देश मोबाईल बनवतात आणि या देशातील तरुणांना मोबाईल दुरुस्तीचा कोर्स करावा लागतो. का असं? भारताच्या रस्त्यांवर नजर पडेल तिकडे जर्मनी, जपानच्या गाड्या का दिसतात? आपण गाड्या का बनवू शकलो नाही? जगाला भारत संगणक, टीव्ही, विमाने का देऊ शकला नाही? बाहेरच्या देशातील एखाद्या घरात भारताने बनवलेल्या किती वस्तू सापडतील? शासनाने कोणती भूमिका निभावली देशाच्या विकासासाठी? आजकाल प्राथमिक शाळांमध्ये खिचडी दिली जाते. बघा शासनाचे निर्णय. या देशात होऊन गेलेले कोणते थोर लोक कोणत्या शाळेत खिचडी खाऊन थोर बनले होते? सर्वोत्तम शिक्षण देण्याची तयारी नाही. मेहनत घेण्याची तयारी नाही. समोर येऊन सहभागी होण्याची तयारी नाही. केवळ दुसऱ्यावर ढकलण्याची सवय आहे. मग फळ कसं मिळेल? देश महासत्ता कसा बनेल? चीन असो वा भारत, अमेरिका असो वा जपान सगळे निसर्गाच्या बंधनात आहेत. ज्यांनी कृती केली त्यांना फळ मिळालं. ज्यांनी कृती केली नाही त्यांच्याकडे राहिले फक्त भावनिक मुद्दे, दोषारोपांच्या गोष्टी, भ्रष्टाचाराच्या घटना, खोटे युक्तिवाद, खोटी स्पष्टीकरणे आणि खोट्या कारणांची यादी.

बऱ्याच वेळा असं म्हटलं जातं 'सगळेच भ्रष्ट असतात असं नाही, काही जण चांगले सुद्धा असतात'. यात काही शंका नाही की सर्व जण भ्रष्ट नसतात. पण मग १०० पैकी २ जण, ५ जण चांगले असल्याने असं तर म्हणता येणार नाही की आता भ्रष्टाचार संपायला सुरुवात झाली. जूनमध्ये पाऊस पडतो पण जर एखाद्या वेळेस जानेवारीमध्ये पडला तर जानेवारीमध्ये पावसाळा येतो असं तर म्हणता येणार नाही. १०० पैकी दहा जण भ्रष्ट असले तर भ्रष्टाचार नाही असं म्हणता येईल. पण १०० पैकी दहाच जण प्रामाणिक असले तर भ्रष्टाचार नाही असं कसं म्हणता येईल?

समुद्रांनी वेढलेले काही बेट, त्यावर राहणारे छोटेछोटे लोक, अणू हल्ल्यांनी विध्वंस झालेली शहरे, निर्बंधांच्या छायेखालचं प्रशासन, कच्च्या मालाचा अभाव, इत्यादी सारख्या विषम गोष्टींनी नवजीवनाला सुरुवात करणारा जपान जर काही कालावधीनंतर स्वतःला आर्थिक महासत्ता सिद्ध करू शकतो, तर भारत महासत्ता न बनण्याचं कोणतं कारण आहे? भारताकडे तर सगळ्या विकासासाठी पूरक असलेल्या गोष्टी आहेत. इतके लोक आहेत की सगळ्यांनी एक तास जरी प्रामाणिकपणे मेहनत घेतली तरी ती जपानने घेतलेल्या दहा तास मेहनतीच्या बरोबर होणार आहे. योग्य तंत्रज्ञान वापरलं तर कोणत्याही देशापेक्षा जास्त उत्पादन करण्याची क्षमता आहे. एकमेकाला मिस्टर म्हणून नाही तर भाऊ, ताई, काका, मामा अशा प्रेमळ नात्याने हाक मारणारे लोक आहेत.

निःसंशय भारत महासत्ता बनू शकतो. पण त्यासाठी पहिली जबाबदारी प्रशासनाची आणि दुसरी सामान्य जनतेची हा क्रम ठरवणं आवश्यक आहे. पहिल्यांदा सुंदर रस्ता बनवणं आमचं काम आणि त्यानंतर त्याला स्वच्छ ठेवणं जनतेचं काम हा क्रम प्रशासनाने समजण्याची गरज आहे. पार्किंगसाठी जागा उपलब्ध करून देणं हे पहिलं काम असतं, मगच चूक ठिकाणी पार्किंग का केली म्हणून दंड घेता येतो हे समजणं आवश्यक आहे. प्रशासनाने कामचोरी न करणं पहिल्यांदा आणि लोकांनी करचोरी न करणं दुसऱ्यांदा हा क्रम लक्षात घेण्याची गरज आहे. हा क्रम उलटा करून किंवा बदलून काहीही साध्य होणार नाही. असं करणं म्हणजे अमानवी कृत्य होईल. जनतेने सगळं करावं आणि आम्ही त्यांना कायद्याच्या नावावर त्रास देत राहू ही प्रवृत्ती बदलण्याची गरज आहे. आपल्या कोणकोणत्या बेशिस्त कृतीमुळे लोकांच्या जीवनात हस्तक्षेप होत आहे याचा विचार करणं आणि त्या संपवून टाकणं आवश्यक आहे. प्रत्येक शासकीय कार्यात लोकांना कशा सुविधा देता येतील व त्यांचा वेळ वाया न जाण्यासाठी काय करता येईल यावर विचार करणं व त्यानुसार कृती करणं आवश्यक आहे.

स्वप्नांत राहून काहीही उपयोग नाही, तारखा ठरवून काहीही उपयोग नाही. लोकांना अनावश्यक गोष्टींत गुंतवून ठेवून काही उपयोग नाही. सध्याची अवस्था बदलून त्या ठिकाणी नियोजनबद्ध कृती करण्याची जबाबदारी जर शासनाने उचलली नाही तर हा देश कधीच महासत्ता बनू शकत नाही. जगाचा विनाश होऊन जाईल पण देश महासत्ता बनलेला दिवस उजाडणार नाही. घराघरांत दिसणारे मोबाइल, रस्त्यावर दिसणाऱ्या गाड्या हे भारताच्या विकासाचं लक्षण नाही. बाहेरच्या कंपन्यांनी विकलेलं ते तंत्रज्ञान आहे. भारताने बनवलेले मोबाइल अमेरिका, रशियात विकले जात असले तर त्याला विकास म्हणता येईल. सुरुवात त्या प्रत्येक गोष्टीला बदलण्यापासून करण्याची गरज आहे ज्यात शासनामुळे लोकांचा एक क्षण सुद्धा वाया जातो. मग ते देशातील रस्ते असोत, शासकीय कामे असोत, न्यायव्यवस्था असो का आणखी काहीही.